विभागीय आयुक्त, कोकण (२०५३ ०३८७) येथील कोंकण भवन इमारतीची साफसफाई तसेच अन्य कामे यांत्रिकी पध्दतीने करण्याच्या कामाच्या खर्चाच्या “१० कंत्राटी सेवा अंतर्गत” या उद्दीष्टाखाली पुरवणी मागणीद्वारे मंजूर झालेल्या उर्वरित तरतुदीच्या वितरणाबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः पूरक-२०१८/प्र.क्र.१७२/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २९/०३/२०१९.

वाचा -

१)विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, कोकण यांचे पत्र क्र. लेखामेळ/आरसीएन-१/ २०५३०३८७/ पुरवणी अनुदान /२०१८/७३८, दि.१७.१०.२०१८
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.पूरक-२०१८/प्र.क्र.१३५/अर्थ-३, दि.५.१२.२०१८
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.पूरक-२०१८/प्र.क्र.२१९/ब-१, दि.६.१२.२०१८
४) शासन निर्णय क्रमांकः पूरक-२०१८/प्र.क्र.१७२/ई-८, दिनांक २८/०२/२०१९
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दिनांक २५/०१/२०१९

प्रस्तावना

विभागीय आयुक्त, कोकण येथील यांनी विभागीय आयुक्त, कोकण येथील कोकण भवन इमारतीची साफसफाई तसेच अन्य कामे यांत्रिकी पध्दतीने करण्याच्या कामाच्या खर्चाच्या “१०-कंत्राटी सेवा अंतर्गत” या उद्दिष्टाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी रु. ९९.३४ लाख मागणी केली होती. यासाठी विधानमंडळाच्या २०१८ च्या हिवाळी अधिवेशनात मंजूर झालेल्या रु. ५०.०० लाख इतक्या पुरवणी मागणीपैकी ७०% म्हणजेच रु. ३५.०० लाख रक्कम संदर्भाधिन क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. आता वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्र. ५ च्या परिपत्रकान्वये पुरवणी मागणीव्दारे मंजूर झालेल्या निधीपैकी उर्वरित २०% म्हणजेच रु. १०.०० लाख इतकी रक्कम वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय

विभागीय आयुक्त, कोकण येथील कोकण भवन इमारतीची साफसफाई तसेच अन्य कामे यांत्रिकी पध्दतीने करण्याच्या कामाचे खर्च अदा करण्यासाठी “१० कंत्राटी सेवा अंतर्गत” या उद्दिष्टाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी रु. १०.०० लाख (रुपये दहा लाख फक्त) निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील परिपत्रकान्वये मंजूर पुरवणी मागणीची रक्कम बीम्सद्वारे वितरित करण्यास संमती देण्यात येत आहे.

२.	या रकमेचा खर्च खालील लेखाशिर्षाखाली माहे नोव्हेंबर-२०१८ च्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीनुसार भागविण्यात यावा:-

मागणी क्रमांक	सी-१
मुख्य/गौण/उपशिर्ष	२०५३, जिल्हा प्रशासन
	००,१०१, आयुक्त,
	(०१)(०१) आयुक्त, कोकण, (अनिवार्य)
	२०५३ ०३८७
	१०-कंत्राटी सेवा

३.	उपरोक्त वितरित निधी अर्थसंकल्पीय प्रणालीवर (BEAMS) वितरित करण्याची कार्यवाही वित्त विभागाशी समन्वय साधून अर्थसंकल्प कार्यासनाने (ब-१) त्वरित करावी.

४.	सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५/०१/२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२९१७२७४६८८१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Ajit Sopanrao Deshmukh
Date: 2019.03.29 17:39:18 +05'30'

अजित देशमुख
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

अपर कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई.

प्रत,

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१,
३. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१,
४. वित्त विभाग, कार्यासन व्यय-९, अर्थसंकल्प-६, मंत्रालय, मुंबई-३२.
५. महसूल व वन विभाग, कक्ष अधिकारी ब-१/पीएसी, मंत्रालय, मुंबई ३२.
६. निवडनस्ती ई-८, कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.